**मराठवाडा विभागातील शेतकरी कुटुंबातील तरुण मुले व महिलांसाठी कौशल्य वृद्धी कार्यक्रम राबविणे बाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: कौविउ- २०१६/ प्र.क्र.१५७ /अभियान-१**
**२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक: ०६ मार्च, २०१७**

<u>वाचा</u> : कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शासन निर्णय क्रमांक कौविउ-२०१५/प्र.क्र.१२२/रोस्वरो-१, दिनांक ०२ सप्टेंबर, २०१५.

**<u>प्रस्तावना:</u>**

राज्यातील मराठवाडा विभागाचे एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी जवळपास ८५ टक्के क्षेत्र हे लागवडीखाली क्षेत्र आहे. या लागवडीखालील क्षेत्रापैकी ५० टक्के क्षेत्र हे आवर्षण व प्रवरण क्षेत्र आहे. यामुळे या भागातील शेतकरी हा कायमच कोरडवाहु शेतीवर अवलंबून असतो. तसेच येथील शेतकऱ्यांना टंचाई , दुष्काळ, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. लोकसंख्येचा विचार करता औरंगाबाद विभागातील ग्रामीण लोकसंख्या , विभागाच्या एकुण लोकसंखेच्या ७२.८८ टक्के आहे तसेच ग्रामीण भागातील बहुतांश लोक शेतीवरच अवलंबून आहेत. मराठवाडयातील शेतीचा विचार करता कोरडवाहू शेती मुळे येथील शेतकऱ्यांना वर्षभर रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही. परिणामी अल्प उत्पन्नामुळे शेतकरी आर्थिक दृष्ट्या कमकुवत होवुन त्यांच्या जीवनमानाचा स्तर खालावला आहे.

तथापी मागील काही वर्षामधे कृषी क्षेत्रामध्ये नवीन तंत्रज्ञानामुळे अमुलाग्र बदल झाले आहेत. परिणामी कृषी क्षेत्रामध्ये बदलत्या तंत्रज्ञानानुरुप शेती व शेती पुरक व्यवसाय/ उद्योग यामधे कुशल मनुष्य बळाची मागणी वाढु लागली आहे. तसेच बदलणा-या तंत्रज्ञानाचा वापर अधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन शेती पुरक उद्योग करुन अर्थार्जनाचे विविध पर्याय उपलब्ध करण्याच्या दृष्टीने शेतक-यांकरीता व त्यांच्या मुलांकरीता कृषी क्षेत्रातील कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे व त्या माध्यमातुन शेतक-यांचे सक्षमीकरण करुन त्यांचे जीवनमान उंचावणे ही काळाची गरज आहे.

सदर बाब विचारात घेउन मराठवाडा भगातील दुष्काळग्रस्त शेतक-यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी कृषी क्षेत्रातील शेती व शेतीस पुरक असणाऱ्या उद्योगधंद्यासंदर्भातील कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राज्यातील युवक युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या क्षेत्रात रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी विभागाने दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे "प्रमोद महाजन कौशल्य व

उद्योजकता विकास अभियान" राबविण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सदर अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था यांना राज्य पातळीवर "नोडल संस्था" म्हणून नियुक्त केले आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार मराठवाडा विभागातील शेतकरी व त्यांच्या कुटुंबासाठी कृषी क्षेत्रातील शेती व शेतीस पुरक उद्योगधंदयाशी संबंधित कौशल्य विकासासाठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेमार्फत तयार करण्यात आलेले अभ्यासक्रम तसेच शेती व शेती पुरक उद्योगधंद्याशी सबंधित खालील कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार प्रत्येक वर्षी सर्वसाधारणपणे ८००० शेतकरी अथवा त्यांचे कुटुंबीय यांचेसाठी कौशल्य वृध्दीचे प्रशिक्षण देण्याचे नियोजित करण्यात आले आहे.

**१.१) कृषी यांत्रिकीकरणाचे कौशल्य विकासाद्वारे प्रशिक्षण**

या विभागातील शेतीतील आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करुन देण्यासाठी व आधुनिक पध्दतीने शेती करण्यासठी उपयोगी असणाऱ्या शेती यंत्राची दुरुस्ती व निगा राखण्याबाबत येथील तरुणांना प्रशिक्षण देऊन कौशल्य बळ निर्माण करणे.

**१.२) कृषी उत्पादन विक्रीकरिता मोबाईल ॲप विकसीत करणे.**

साधारणपणे शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त भाव व बाजारपेठ मिळणे अत्यंत आवश्यक असते. ही बाब विचारात घेता शेतमालाला अधिकाधिक भाव कोणत्या बाजारपेठेत मिळू शकेल किंवा विविध बाजारपेठेमधील शेतमालाचा भाव किती आहे इत्यादी सारख्या गोष्टी शेतकऱ्यांना मोबाईलवर एक चांगले मोबाईल ॲप विकसीत केल्यास त्यांना नक्की फायदा होईल. यासाठी कौशल्य विकासाद्वारे तरुणांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

**१.३) मृदा व संवर्धन व मृदा तपासणी.**

शेतीची उत्पादन मुख्यत: शेत जमीनीतील मृदेवर अवलंबून असते. व अधिक शेती उत्पादनासाठी मृदेचा कस व उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येतील यादृष्टीने या भागातील तरुण व महिलांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून मृदा संवर्धन निर्माण करणे .

**१.४) शेतीस पुरक जोड व्यवसायांना कौशल्य विकासाच्या माध्यमातून प्रोत्साहन.**

कौशल्य विकासाचा वापर करुन या भागात समृध्दी आणण्यासाठी शेतीला पुरक असे व्यवसाय जसे की, फुलांची शेती, रेशीम उत्पादन आणि प्रक्रिया, मधुमक्षिका पालन, डेरी पदार्थाची निर्मिती व विक्री, कुक्कट पालन व शेळी पालन असे जोड व्यवसाय सुरु करण्याचे प्रशिक्षण कौशल्य विकासाच्या माध्यमातून देता येईल.यासाठी तरुणांना व महिलांना अणणासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांच्या मार्फत बिज भांडवल योजनेतून कर्ज देऊन लहान लहान उद्योग उभे करता येतील.

**१.५) शेत मालावर प्रक्रिया व पॅकेजिंग याकरीता कौशल्य विकास विकसीत करणे.**

बहुतांश वेळा उत्पादित केलेलो शेतमाल हा जास्त काळ टिकवून ठेवता येत नाही. त्यासाठी कौशल्य विकासाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेरोजगार तरुण आणि महिलांना

कोल्ड स्टोरेज टेक्निशियन व ग्रीन हाऊस टेक्निशिय चे प्रशिक्षण देणे.तसेच उत्पादित केलेला शेतमाल हा आधिकाधिक आकर्षित पध्दतीने पॅकेजिंग करुन तो बाजारपेठेत कसा उपलब्ध करुन देता येईल, याचे प्रशिक्षण आवश्यक आहे.

उसा पासून साखर अथवा गुळ तयार करताना उसाच्या टाकावून भागापासून तसेच कापसापासून सुत बनविण्याचे प्रक्रिये दरम्यान गोवऱ्या बनविण्याचे प्रशिक्षण शेतकऱ्यांना कुटुंबियांना देऊन स्वस्त इंधनाचा पर्याय उपलब्ध होऊ शकेल. याशिवाय बेरोजगारांनाही रोजगार उपलब्ध होण्यास मदत होईल.

## १.६) कृषी विद्यापिठांशी M.O.U करणे.

राज्यामध्ये अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे कृषी विद्यापिठ काम करीत असून त्यांचे सोबत एम.ओ. यु. करुन त्या विद्यापिठामध्ये मराठवाडयाचे तरुण युवक व महिला शेती व शेतीस पुरक असणाऱ्या उद्योगधंद्याच्या. अनुषंगाने कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यासाठी कृषी विद्यापिठामध्ये कौशल्य विकास केंद्र उपलब्ध करणे.

## १.७) वैल्यू चेन उभी करणे :-

मराठवाडयाच्या काही भागामध्ये कापूस आणि रेशीमचे काम परंपरागत पध्दतीने मोठया प्रमाणावर केले जाते. विशेषत: पैठणी साडी जी संपूर्ण देशात प्रसिध्द आहे अशा व्यवसायाचे कौशल्य विकासाच्या माध्यमातून महिला व तरुणींना नवीन डिझाईन व टेक्नोलॉजीचे प्रशिक्षण देऊन परंपरागत व्यवसायामधून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे.

## १.८) मराठवाडयामध्ये प्रत्येक जिल्हयामध्ये नियमित जॉब फेअर आयोजित करणे.

मराठवाडयात हळू हळू उद्योगाचा विकास होत असून या विषयाच्या संदर्भाने औरंगाबाद येथे औद्योगिक संस्था यांचेशी चर्चा झाली असून त्यांच्या सहकार्याने मराठवाडयामध्ये स्मॉल स्कील उद्योगामध्ये तरुणांना रोजगार मिळण्यासाठी उद्योग संस्थांसोबत एम.ओ.यु. करुन त्यांना प्रशिक्षण देणे जेणेकरुन त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

## २. मराठवाडयामध्ये महिला आणि मुलींना स्कील सखी च्या माध्यमातून प्रशिक्षण देणे.

स्कील सखीचा प्रयोग या विभागाने यु.एन.डी.पी. यांच्या सहकार्याने नागपूरमध्ये केला असून तेथे जवळ पास ५०० स्कील सखी या नव्याने तरुण मुलींना प्रशिक्षण देऊन ही स्कील सखी त्या गावाच्या महिला व युवतीला त्यांच्या आवडीच्या विषयामध्ये कौशल्य प्रशिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देतात, असाही प्रयोग मराठवाडयामध्ये केल्यास येथे सुध्दा प्रत्येक जिल्हयामध्ये स्कील सखी या नव्याने तरुण महिला व मुलीना प्रशिक्षण देऊन प्रत्येक गावामध्ये स्कील सखी पाठवून प्रत्येक गावामध्ये महिलांना शेती किंवा शेतीस पुरक असणाऱ्या उद्योग धंद्याच्या अनुषंगाने कौशल्य विकासाची संधी उपलब्ध करुन देता येईल.

३. सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानाकरिता मागणी क्रमांक झेडए-१, २२३० कामगार व सेवायोजन, राज्य योजनांतर्गत योजना, (०१)(०८) प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान (२२३० ६११८) या लेखाशिर्षाखाली रूपये ११९.५२ कोटी इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

विभागाकडे उपलब्ध असलेल्या या निधीतून उपरोक्त प्रस्तावात अंतर्भूत असलेला सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाचा रुपये ६,०१,५०,०००/- इतका अपेक्षित खर्च भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २६३/१४७१, दिनांक १९/११/२०१६ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २५८/अर्थ-१८/१६, दिनांक ०७/११/२०१६ च्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०१७०३०६१७४३२७२२०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

S.G. Patil

Digitally signed by S.G. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SDED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f64f9296da4ba15d02d3ad3826a21a74ed080355ac04eef5617c3b4f08af47ae, cn=S.G. Patil
Date: 2017.03.06 18:25:15 +05'30'

(सं.गि. पाटील)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत :**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व मा. मंत्री, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
६. सर्व विधान परिषद/विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ,
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई
८. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), मुंबई
१०.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ( विधान परिषद), मुंबई
११.आयुक्त, कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्था, कफ़ परेड, मुंबई
१३.आयुक्त तथा संचालक नगर परिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई
१४.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-१ महाराष्ट्र मुंबई
१५.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२ महाराष्ट्र नागपुर
१६.महालेखापाल ( लेखा परिक्षा )-१ महाराष्ट्र मुंबई
१७.महालेखापाल ( लेखा परिक्षा )-२ महाराष्ट्र नागपुर
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९.निवासी व लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

२०.सर्व विभागीय आयुक्त

२१.सर्व जिल्हाधिकारी

२२.आयुक्त सर्व महानगर पालिका

२३.संचालक (प्रशिक्षण/व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुबई

२४.सह संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण , प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ नागपुर/ अमरावती/औरंगाबाद/ नाशिक

२५.उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/ पुणे/ नागपुर/अमरावती/औरंगाबाद/ नाशिक

२६. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता, मंत्रालय, मुंबई.

२७. निवड नस्ती.